Special Ph.D. Entrance Test
Faculty : Commerce
Subject Code : 205
Business Policy & Administration

11-1st Half-12 mina (g)

**Con. 4973-12.** **KK-1234**

(3 Hours) **[ Total Marks : 100**

14th July. 2012

**विभाग १ -- (गुण ४०)**

**(सूचना : सर्व** प्रश्न **अनिवार्य** आहेत.)

खालील **प्रत्येक** प्रश्नासाठी **चार** पर्याय दिलेले आहेत, त्यापैकी **अचूक** पर्यायाची निवड करा :–

१. मध्यम पातळीवरील व्यवस्थापनाचे महत्त्वाचे कार्य सांगा.
   (अ) ध्येयधोरण अंमलबजावणी (क) निर्णय घेणे
   (ब) ध्येयधोरण ठरविणे (ड) नियोजन करणे

२. उच्च व्यवस्थापनाचे प्रमुख कार्य कोणते ?
   (अ) उद्दिष्टे व ध्येय धोरण ठरविणे (क) आदेश देणे
   (ब) धोरण अंमलबजावणी (ड) यापैकी नाही

३. राष्ट्रीय उत्पादकता मंडळाची स्थापना केव्हा झाली ?
   (अ) १९५८ (क) १९६२
   (ब) १९६७ (ड) १९९५

४. केंद्रीय लघुउद्योग संस्था केव्हा स्थापन झाली ?
   (अ) १९५० (क) १९६०
   (ब) १९५५ (ड) १९६५

५. के. आर. अॅन्ड्र्यू यांनी व्यावसायिकतेचे किती निकष सांगितले आहेत ?
   (अ) २ (क) ९
   (ब) ५ (ड) ११

६. 'दि फिलॉसॉफी ऑफ मॅनेजमेंट' हा ग्रंथ कोणी लिहिला ?
   (अ) हेन्री फेयॉल (क) एफ. डब्ल्यू टेलर
   (ब) ऑलिव्हर शेल्डन (ड) पीटर ड्रकर

७. अधिकाराच्या केंद्रिकरणामुळे काय होते ?
   (अ) व्यवस्थापकाचे अधिकार कमी होतात (क) व्यवस्थापकाचे महत्त्व वाढते
   (ब) व्यवस्थापकाचे अधिकार वाढतात (ड) यापैकी नाही

[ TURN OVER

८. कार्याच्या विभाजनामुळे ---------------- वाढ होते.

(अ) कामगार संख्येत (क) कामगार अदलाबदलीचे प्रमाण

(ब) कामगार कार्यक्षमता (ड) यापैकी नाही

९. खालीलपैकी हेन्री फेयॉल यांनी कोणते तत्त्व सांगितले नाही ?

(अ) श्रमविभागणी तत्त्व (क) अधिकार व जबाबदारी तत्त्व

(ब) आदेशातील एकवाक्यता तत्त्व (ड) अपवाद तत्त्व

१०. आदेशातील एक वाक्यता म्हणजे काय ?

(अ) एकाच वेळी अनेक अधिकाऱ्यांकडून आदेश मिळणे

(ब) एकाच वेळी एकाच अधिकाऱ्याकडून आदेश मिळणे

(क) एकाच वेळी सर्वांना आदेश देणे

(ड) यापैकी नाही

११. गिफेन वस्तू म्हणजे काय ?

(अ) हलक्या दर्जाच्या वस्तू (क) अत्यावश्यक वस्तू

(ब) उच्च दर्जाच्या वस्तू (ड) चैनीच्या वस्तू

१२. काड्या पेट्यांना असणारी मागणी ----------------

(अ) लवचिक असते (क) वाढते

(ब) ताठर असते (ड) कमी होते

१३. रूढ अर्थशास्त्रीय सिद्धांतामध्ये मागणी विश्लेषणाचा हेतू बाजारातील किंमतीचे स्पष्टीकरण देणे हा असतो, तसेच विवेचन सोपे व्हावे या सर्व हेतूंना ---------------- म्हणतात.

(अ) सैद्धांतिक हेतू (क) इच्छाशक्ती

(ब) मागणी विश्लेषण हेतू (ड) गरजा

१४. ज्या वस्तूला पर्याय असतील अशा वस्तूंना असणारी मागणी ---------------- असते.

(अ) अलवचिक (क) मागणी विश्लेषण

(ब) लवचिक (ड) उपयोगिता सिद्धांत

१५. जर गिफेन वस्तूंच्या किंमती कमी झाल्यातर मागणी ----------------.

(अ) वाढते (क) मागणीवर परिणाम होत नाही

(ब) कमी होते (ड) विस्तारते

१६. मागणीबाबत पूर्ण अंदाज करणे व मागणीतील योग्य ते बदल घडवून आणणे हे ---------------- .

(अ) मागणी विश्लेषणाचे व्यावसायिक हेतू
(ब) मागणी विश्लेषणाचे सैद्धांतिक हेतू
(क) मागणी विश्लेषण मूळ हेतू
(ड) पुरवठा विश्लेषण मूळ हेतू

१७. किंमत व मागणी यांचा संबंध कसा असतो ?

(अ) सम
(ब) व्यस्त
(क) चांगला
(ड) यापैकी नाही

१८. किंमतीत वाढ झाल्याने मागणीत जी घट होते त्या मागणीच्या घटीला ---------------- म्हणतात.

(अ) मागणी संकोच
(ब) किंमत वृद्धी
(क) किंमत वाढ परिणाम
(ड) उत्पन्न वाढ परिणाम

१९. मागणी वक्र कसा असतो ?

(अ) 'अक्ष' अक्षाला समांतर असतो
(ब) 'अय' अक्षाला समांतर असतो
(क) डावीकडून उजवीकडे वरुन खाली येणारा असतो
(ड) उजवीकडून डावीकडे खाली येणारा असतो

२०. मागणी हे किंमतीचे काय आहे ?

(अ) फलन
(ब) घटक
(क) निर्धारक
(ड) संवर्धन करणारे

२१. सनातनवाद्यांच्या संभाव्यते संबंधीच्या दृष्टिकोणात ---------------- .

(अ) प्रयोगाचे सर्व शक्य परिणाम परस्पर असमाविष्ट आणि समान शक्यतेचे असतात
(ब) प्रयोगाचे सर्व शक्य परिणाम परस्पर समाविष्ट आणि समान शक्यतेचे नसतात
(क) प्रयोगाचे सर्व शक्य परिणाम परपस्पर असमाविष्ट आणि समान शक्यतेचे नसतात
(ड) वरीलपैकी एकही नाही

२२. सामान्य संभाव्यता वक्र ----------------.

(अ) बहुलकी असतो
(ब) द्विबहुलकी असतो
(क) बहुलकी आणि द्विबहुलकी असतो
(ड) वरीलपैकी एकाही आकारमानाचा नसतो

२३. सामान्य वितरणाच्या बाबतीत विनलीयता ---------------- एवढी असते.

(अ) १·५
(ब) ०·५
(क) ०
(ड) ०·२

२४. सामान्य वितरणाच्या बाबतीत गणिती माध्य, मध्यगा आणि बहूलक यांचे मुल्य ---------------.

(अ) समान असतात (क) अनिश्चित असतात

(ब) असमान असतात (ड) शून्य असतात

२५. दोन चलातील संबंधाचे प्रमाण निश्चित करण्यासाठी --------------- चा वापर केला जातो.

(अ) समाश्रयण (क) गणिती माध्य

(ब) सहसंबंध (ड) वरीलपैकी एकही नाही

२६. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया बँकिंग व तत्सम आर्थिक क्षेत्राबाबत आकडेवारी कोणत्या प्रकाशनामधून जाहीर करते ?

(अ) बँकिंग स्टॅटिस्टिकल बुलेटिन (क) रिपोर्ट ऑन करन्सी अँड फायनान्स

(ब) आर. बी. आय. बुलेटीन (ड) 'ब' व 'क' दोन्ही प्रकाशन

२७. बँक दर म्हणजे काय ?

(अ) सहकारी बँका आपल्या ग्राहकांना कर्जे देतात तो दर

(ब) जागतिक बँकेकडून आपल्या देशाला कर्ज मिळते तो दर

(क) रिझर्व्ह बँक व्यापारी बँकांना ज्या दराने कर्ज देते तो दर

(ड) व्यापारी बँका आपल्या ग्राहकांना ज्या दराने कर्जे देते तो दर

२८. 'नाबार्ड' या संस्थेचे स्वरुप विचारात घेता या संस्थेचे वर्णन कोणत्या शद्बात करतात ?

(अ) महामंडळ (क) संस्था

(ब) बँक (ड) परिषद

२९. कोणत्या बँका शेतीला दिर्घ मुदतीच्या कार्याचा पुरवठा करतात ?

(अ) व्यापारी बँका (क) भू-विकास बँका

(ब) सहकारी बँका (ड) विनिमय बँका

३०. भारतात कोणती बँक हुंडणावळ दर स्थिर राखते ?

(अ) स्टेट बँक (क) आर. बी. आय.

(ब) बँक ऑफ इंडिया (ड) सेंट्रल बँक

३१. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्यालय कोठे आहे ?

(अ) पुणे (क) नागपूर

(ब) मुंबई (ड) वर्धा

३२. देशांतर्गत उत्पादनावर आकारलेल्या करास काय म्हणतात ?
(अ) अबकारी क़र (क) विक्री कर
(ब) आयात कर (ड) जकात कर

३३. भारताची आयात वाढण्याचे प्रयत्न करुनही ती कमी न होण्याचे प्रमुख कारण म्हणजे –
(अ) औद्योगिक विकासाची गरज (क) आयातीला असलेले शासकीय उत्तेजन
(ब) चैनीच्या वस्तूंचे वाढीव आकर्षण (ड) यापैकी कोणतेही नाही

३४. भारतात आयात-निर्यात बँक केंव्हा स्थापन झाली ?
(अ) १९८० (क) १९८२
(ब) १९८५ (ड) १९८६

३५. ---------------- ला पुरक म्हणून जागतिक बँकेची निर्मिती झाली.
(अ) आय. डी. ए. (क) आय. डी. बी. आय.
(ब) आय. एम्. एफ्. (ड) आय. एफ्. सी.

३६. जागतिक बँकेचे खालीलपैकी कोणते उद्दिष्ट होऊ शकत नाही.
(अ) आंतरराष्ट्रीय व्यापाराला प्रोत्साहन (क) आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीला योग्य वातावरण
(ब) शांतता व सहकार्य वाढविणे (ड) सभासद राष्ट्रांना कृषी व तांत्रिक मदत

३७. शासकीय व्यापार हा ----------------.
(अ) आयात रोखण्याचा एक जकातेतर अडथळा होय
(ब) आयात वाढविण्याचा एक मार्ग होय
(क) आयात नियंत्रित करण्याचा एक मार्ग होय
(ड) आयात स्थिर ठेवण्याचा मार्ग होय

३८. बँकेच्या व्यवस्थापन कार्यात खालीलपैकी कोणता घटक येत नाही ?
(अ) बोर्ड ऑफ गव्हर्नर्स (क) कर्ज समिती
(ब) संचालक मंडळ (ड) आर्थिक मदत समिती

३९. जागतिक बँकेच्या सभासद राष्ट्राला आपल्या हिश्याच्या --------------- भाग स्वतःच्या चलनाच्या स्वरुपात द्यावा लागतो.
(अ) १०% (क) ३०%
(ब) १८% (ड) ३५%

४०. ब्रिटन आणि अरब राष्ट्रातील --------------- चा संघर्ष समाधानकारकरीत्या सोडविण्याचे श्रेय जागतिक बँकेला द्यावे लागते.
(अ) सुएझ कालवा (क) भाक्रा-नांगल
(ब) नागझिरा कालवा (ड) यापैकी नाही

[TURN OVER

## विभाग २ -- (गुण ३०)

खालीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. कृतीयोजना अपयशी ठरण्याची कारणे सांगून कृतीयोजनेच्या मर्यादा स्पष्ट करा. १०

२. उद्दिष्टे म्हणजे काय ? त्यांचे स्वरुप स्पष्ट करा. १०

३. स्थिर विनिमय दर, बदलते विनिमय दर आणि तरते विनिमय दर म्हणजे काय ? १०

४. परकीय व्यापार गुणकावर कोणते घटक परिणाम करतात तसेच त्याच्या मर्यादा स्पष्ट करा. १०

५. संशोधन म्हणजे काय ? संशोधनाचे नियोजन कसे कराल ? १०

## विभाग ३ -- (गुण ३०)

खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१. सामाजिक संशोधन करणारे संशोधनाशी संबंधीत कोणते मुलभूत प्रश्न उपस्थित करतात ? का ? १५

२. कृतीयोजनेच्या मूल्यमापन आणि नियंत्रणामध्ये कुठल्या पायऱ्यांचा समावेश असतो ? कृती योजनेच्या अंमलबजावणीला सहकार्य करणारे सहा घटक स्पष्ट करा. १५

३. जागतिक स्तरावरील स्पर्धेला तोंड देण्यासाठी कृतीयोजनेचे सविस्तर स्पष्टीकरण द्या. १५

४. व्यापार शर्ती म्हणजे काय ? व्यापार शर्तींचे मोजमाप कसे केले जाते ? १५

--------------------